**परिशिष्ट २**

प्रकल्पाचे नांव - डोमरी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प डावा कालवा कि.मी.७ ते १० मौ.नवगण राजुरी **ता. बीड जि. बीड**

प्रकल्पाचे विवरणः- डोमरी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प डावा कालवा कि.मी.७ ते १० मौ.नवगण राजुरी **ता. बीड जि. बीड**

सामाजिक फायदे :- **जलसाठयासाठी**

**परिशिष्ट ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण**

**गावाचे नांव :-** डोमरी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प डावा कालवा कि.मी.७ ते १० मौ.नवगण राजुरी **ता. बीड जि. बीड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | क्षेत्र (हे.आर ) |
|---|---|---|
| | लागु नाही. | |

**परिशिष्ट ४**

**अनुसूची- चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.**

**टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी भुसपादन जायकवाडी प्रकल्प** बीड **यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.**

**परिशिष्ट ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

१) प्रशासकाचे पदनाम :- लागू नाही

२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :- लागू नाही.

३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमुद करावे:-

लागू नाही.

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम (१) खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत **उपजिल्हाधिकारी जायकवाडी प्रकल्प बीड** यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

दिनांक : **.०९.२०२५**

ठिकाण : बीड

**उपजिल्हाधिकारी भुसंपादन**
**जायकवाडी प्रकल्प बीड.**

---

७

**उपजिल्हाधिकारी भुसंपादन जायकवाडी प्रकल्प बीड**

**भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम ११ नुसार अधिसुचना**

दिनांक. **.०९.२०२५**

**क्र.२०२४/एलएनक्यु/एसआर/५७/०५.–** ज्याअर्थी,महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाची अधिसुचना क्र.मिस/**११/२०१४/सीआर/७७/अ२ दिनांक १९ जानेवारी २०१५** (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल ) भुमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ३ पोटकलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन असे अधिसुचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३(अ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत ५०० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास सदर जिल्हयाचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल.

त्या अर्थी,सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी,बीड हे समुचित शासन आहे. त्या अर्थी,परिशिष्ट १ मध्ये नमुद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासु शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी,परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी,परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणा बाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी,परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणा-या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उपकलम (४) अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पुर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती,प्राथमिक अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर नाही किंवा कोणताही व्यवहार/हस्तांतर करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने,या तरतुदीचे जाणीवपुर्वक

उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकल (५) व भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे कलम १० उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहीत करण्यात येईल त्याप्रमाणे भुमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.आणि ज्या अर्थी,सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी,बीड हे समुचित शासन असल्याने **उपजिल्हाधिकारी भुसंपादनजायकवाडी प्रकल्प बीड** यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट १**

**जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव :-** पाझर तलाव क्र.०३ पिंपळवाडी (बाशींगनाला) **ता. बीड जि. बीड**

| **अ.क्र.** | **स.नं./ग.नं.** | **क्षेत्र (हे.आर)** |
|---|---|---|
| १ | २१९ पै | ०.२१ |
| २ | २२१ पै | ०.१३ |
| ३ | २२१ पै | ०.२६ |
| ४ | २२१ पै | ०.२२ |
| ५ | २२१ पै | ०.१७ |
| | **एकुण** | **०.९९** |

**परिशिष्ट २**

प्रकल्पाचे नांव - पाझर तलाव क्र.०३ पिंपळवाडी (बाशींगनाला) **ता. बीड जि. बीड**

प्रकल्पाचे विवरणः- पाझर तलाव क्र.०३ पिंपळवाडी (बाशींगनाला) **ता. बीड जि. बीड**

सामाजिक फायदे :- **जलसंधारण**

(आर्थिक,रोजगार व इतर फायदे )

**परिशिष्ट ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण**

**गावाचे नांव :-** पाझर तलाव क्र.०३ पिंपळवाडी (बाशींगनाला) **ता. बीड जि. बीड**

| **अ.क्र.** | **स.नं./ग.नं.** | **क्षेत्र (हे.आर )** |
|---|---|---|
| | **लागु नाही.** | |

**परिशिष्ट ४**

**अनुसूची- चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.**

**टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी भुसपादन जायकवाडी प्रकल्प** बीड **यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.**

**परिशिष्ट ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

१) प्रशासकाचे पदनाम :- लागू नाही

२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :- लागू नाही.

३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमुद करावे:-

लागू नाही.

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम (१) खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत **उपजिल्हाधिकारी जायकवाडी प्रकल्प बीड** यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

दिनांक : **.०९.२०२५**

ठिकाण : बीड

**(कविता जाधव)**
**प्र.उपजिल्हाधिकारी भुसंपादन**
**जायकवाडी प्रकल्प बीड.**